# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of stolen property**

**Police Station** :- **WashimCity**

**Date of Good Work done** :- **27/08/2022**

**Brief of the work done :-**

कोचिंग क्लासेससमोरून महागड्या सायकली चोरणाऱ्या चोरट्यास पो.स्टे.वाशीम शहर पोलिसांनी केली अटक; 70 हजारांच्या 09 सायकली जप्त.

**लोकमत**

## महागड्या सायकली चोरणारा आमिर खान गजाआड

### कोचिंग क्लासेस त्याचे 'टार्गेट' : ७० हजारांच्या ९ सायकली जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

वाशिम : शहरातील कोचिंग क्लासेसमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या महागड्या सायकली चोरणाऱ्या आमीर खान एजाज खान पठाण (३०, सवेरा कॉलनी, गोटे कॉलेजसमोर, वाशिम) यास डी. बी. पथकाने अटक केली. त्याच्याकडून ७० हजार रुपये किमतीच्या ९ सायकली जप्त करण्यात आल्या. आरोपीवर विविध कलमांन्वये गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, रवींद्र दहापुते यांनी २४ ऑगस्ट रोजी वाशिम शहर पोलिसांत त्यांची मुलगी मनस्वी आणि तिची मैत्रीण श्रद्धा गोटे या दोघींच्या सायकली सायन्स क्लब कोचिंग क्लाससमोरून चोरीला गेल्याची तक्रार दाखल केली. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून घेतला.

वाशिम शहर पोलीस निरीक्षक रफीक शेख यांनी डी.बी. पथकास आदेश देऊन तपासकामी रवाना केले. गोपनीय माहितीच्या आधारे पथकातील कर्मचाऱ्यांनी आमीर खान एजाज खान पठाण यास हिंगोली नाका येथून ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता, त्याने गुन्ह्याची कबुली दिली.

पोलिसांनी त्याच्याकडून वेगवेगळ्या कोचिंग क्लासेससमोरून चोरून नेलेल्या एकूण ९ सायकली जप्त केल्या. या कारवाईत डी.बी.चे सपोनि खंदारे, लालमणी श्रीवास्तव, सखाराम वंजारे, रामकृष्ण नागरे, मात्रे, विठ्ठल महाले, अनिल बोरकर यांनी सहभाग नोंदविला.



#### मालकांनी सायकली घेऊन जाव्यात

डीबी पथकाने आरोपी आमिर खान याच्याकडून जप्त केलेल्या नऊ सायकली वाशिम शहर पोलीस स्टेशनच्या आवारात उभ्या करण्यात आल्या आहेत. मूळ मालकांनी ओळख पटवून सायकली घेऊन जाव्यात, असे आवाहन शहर पोलीस निरीक्षक शेख रफिक यांनी केले आहे.